जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४०    दिनांक -१५/०१/२०२४**

पर्वती पो स्टे पुणे शहर

## जेष्ठ महिलेची सोनसाखळी चोरणारा चेन स्नॅचर जेरबंद

दि.१०/०१/२०२४ रोजी पर्वती पोलीस स्टेशन हद्दीतील तुळशीबागवाले कॉलनी, सहकार नगर,पुणे येथे जेष्ठ महिला फिर्यादी हया सायंकाळी रस्त्यावरुन पायी फिरत असताना,त्यांचे पाठीमागुन मोपेड चालकाने फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचा नेकलेस हिसका मारुन जबरदस्तीने चोरुन नेला होता. त्याबाबत **पर्वती पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. १७/२०२४ भा.द.वि कलम ३९२** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयांचा तपास करीत असताना तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सहकारनगर भागामध्ये येण्याचे व जाण्याचे मार्गावर तांत्रिक विश्लेषणाव्दारे नमुद चेन स्नॅचरचा माग काढत असताना,पोलीस अंमलदार, प्रकाश मरगजे, अमित चिव्हे यांना दाखल गुन्हयांतील आरोपी हा लक्ष्मी रोड येथे गाडीसह उभा असल्यचे दिसुन आले. सदरची माहिती तात्काळ वरिष्ठांना कळवुन,त्यांनी केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे पोलीस उप निरीक्षक,चंद्रकांत कामठे तपास पथकाचे स्टाफसह नमुद रस्त्यांवर सापळा लावुन अत्यंत शिताफीने सदर इसम यास पकडुन त्याचा नांव पत्ता विचारता,त्याने त्याचे नांव **शशिकांत यशवंत पाटोळे,वय-३२ वर्षे,रा.लेन नं.१४,दत्तमंदीर जवळ,जनता वसाहत,पर्वती,पुणे** असे सांगितले. त्याचेकडुन गुन्हयांत चोरलेले दोन तोळे वजानाची सोन्याची चैन व दुचाकी असा १,३०,०००/-रु.कि.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपीतास अधिक विश्वासात घेवुन तपास केला असता,त्याने घडलेल्या गुन्हयाबाबत कबुली दिली असुन दाखल गुन्हयाबाबत अधिक तपास करता त्याने शेअर मार्केट मध्ये नुकसान झाल्याने चेन स्नॅचिंग केली असल्याचे सांगितले आहे. त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन दाखल गुन्हयांचा पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक चंद्रकांत कामठे हे करत आहेत.

सदरची कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविण कुमार पाटील,पोलीस उप-आयुक्त,परि-०३,श्री.संभाजी कदम, मा.सहा.पोलीस आयुक्त सिंहगड विभाग श्री.अप्पासाहेब शेवाळे,वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.जयराम पायगुडे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे) श्री.विजय खोमणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक, चंद्रकांत कामठे, पोलीस अंमलदार,प्रकाश मरगजे, अमित चिव्हे, अमोल दबडे, दयानंद तेलंगे-पाटील, प्रशांत शिंदे, पुरुषोत्तम गुन्ला, सुर्या जाधव आणि सद्दाम शेख यांनी केली आहे.